सं. फौजदारी प्रकरण क्र.११९/२०२२
शासन वि. नारायण
नि.क्र. १३

**अभियोग पक्षाचा सा.क्र. ०१ यांचा शपथेवर पुरावा आरोपी विरुध्द फौ.प्र.सं. कलम ३०९ प्रमाणे.**

मी याद्वारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करुन सांगतो की,

माझे नांव – सुरेश भागवत गड्डीमे

वय – ३९ वर्षे, धंदा – पो.कॉ. ब.नं. १५९९

रा. चाकूर ता.चाकूर जि. लातूर.

**सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती पी.एस. भराडीया यांच्या तर्फे सरतपास**

१. सन २०२२ मध्ये मी चाकूर पोलीस ठाण्यात पोलीस नाइक या पदावर कार्यरत होतो. दि.२३.०३.२०२२ रोजी हजेरी मेजर पोलीस हवालदार गुंडरे ब.नं. १३११ यांनी गुन्हा क्र. ९७/२०२२ कलम ३०२ भादवि. मधील संशयीत आरोपी नारायण इरबतवाड यांची देखरेख करण्याकरीता बोलाविले होते. त्यावेळी माझ्या सोबत ब.नं. १३४४ गोमारे, पो.ना. हे होते. गोमोरे गैरहजर असल्यामुळे मी एकटाच होतो. त्याबाबत मी हजेरी मेजर गुंडरे यांना सांगितले होते.

२. हजेरी मेजर गुंडरे यांनी ब.नं. १५६५ चव्हाण पोलीस नाईक यांची नियुक्ती आरोपीची देखरेख करण्याकरीता रात्री ०८.०० वा. केली होती व ते ०९.०० वा. हजर झाले होते. रात्री ०९.०० ते १२.०० वाजे पर्यंत आम्ही एकत्र होतो. मी ०९.०० ते १०.०० च्या दरम्यान शेजारी खोलीमध्ये जेवण करण्यास गेलो होतो. रात्री १२.०० वा. लॉकअप येथे जाऊन पाहिले असता मला असे दिसले की, आरोपी नारायण यांना हातकडी घालून लॉकअपच्या बाहेर बसविले होते. मला तेथे समजले की, पोलीस निरीक्षक मोहीते यांनी पोलीस स्टेशन डायरीला नोंद करुन आरोपीला हातकडी घातली होती.

३. रात्री १२.०० ते सकाळी ०५.०० वाजेपर्यंत पोलीस नाईक

चव्हाण ब.नं. १५६५ या दरम्यान आरोपी नारायण हा त्यांच्या देखरेखीखाली होता. त्यानंतर सकाळी ०५.०० वा. मी डयुटीवर हजर झालो होतो. ठाण्यातील सफाई कामगार पठाण हे तेथे साफसफाई करण्याकरीता सकाळी ०५.०० वा. आले होते. त्यावेळी आरोपी नारायण लॉकअपच्या बाहेर गजाळीच्या शेजारी झोपलेला होता.

४. साफसफाई होत असल्यामुळे मी ठाण्याच्या बाहेरील वरांडयात उभा होतो. पठाण यांनी साफसफाई करुन ते पाठीमागे सहा. पोलीस उप अधिक्षक यांच्या कार्यालयात गेले होते. मी त्यावेळी लघुशंकेकरीता गेलो होतो. मी लघुशंकेवरुन जाऊन आल्यावर मला आरोपी त्यांच्या जागेवर दिसून आला नाही. आरोपी हा हातकडीतून हात बाहेर काढून गेला होता. हातकडी ही गजाळीला होती. ठाणे अंमलदार हाश्मी मॅडम यांना आरोपी पळून गेल्याची माहीती मी दिली होती. हाश्मी मॅडम यांनी पोलीस निरीक्षक मोहीते यांना त्याबाबत माहीती दिली. पोलीस निरीक्षक यांनी आम्हाला आरोपी नारायण यांच्या शोधाकरीता नियुक्त केले होते.

५. दि. २४.०३.२०२२ रोजी आरोपीचा शोधा शोध केली परंतू आरोपी रात्री पर्यंत मिळून आला नाही. त्यानंतर दुस–या दिवशी दि. २५.०३.२०२२ रोजी आरोपी नारायण हा पळून गेला होता याकरीता मी फिर्याद दिली होती. आता मला ती फिर्याद दाखविली,त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, फिर्यादीला नि.क्र. पी.–१ पी.डब्ल्यु–१/१४ देण्यात येते. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. आज आरोपी न्यायालयात हजर नाही.

**सरतपास पूर्ण.**

सं. फौजदारी प्रकरण क्र.११९/२०२२
शासन वि. नारायण
नि.क्र. १३

**उलट तपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्रीमती नयना इरबतनवाड यांना पुकारले असता गैरहजर, आरोपी गैरहजर करीता– उलटतपास नाही.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,

VIKAS SHIVAJI WAGHMODE
Digitally signed by VIKAS SHIVAJI WAGHMODE
Date: 2025.03.18 13:35:13 +0530

(व्ही.एस. वाघमोडे)

दि. १८.०३.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, चाकूर.